**कोविड-19 रुग्णांसाठी वापरावयाचे "INFLIXIMAB" या प्रतिविषाणू औषधाच्या पुरवठयाबाबत स्थायी कार्यप्रणाली**

क्रमांक ससाशा/सारोनियंत्रण/04/2021
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
रत्नागिरी. दिनांक-30/04/2021.

**<u>वाचले</u>:-** 1) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम - 2005.
2) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम - 1897.

**<u>आदेश</u>:-**

कोविड-19 या साथरोगाचा सद्या राज्यात मोठया प्रमाणावर प्रसार वाढलेला आहे. कोविड रुग्णांच्या HRCT चाचणीच्या अहवालानुसार "**INFLIXIMAB**" हे प्रतिविषाणू इंजेक्शन रुग्णांना देणेबाबत प्रचलित आदेश आहेत. सदया राज्यामध्ये "**INFLIXIMAB**" या प्रतिविषाणू इंजेक्शनची फार कमतरता आहे. रत्नागिरी जिल्हयामधील कोविड रुग्णांचे वाढते प्रमाण व "**INFLIXIMAB**" या प्रतिविषाणू इंजेक्शनची कमतरता यामुळे गरजू कोविड रुग्णांना हे इंजेक्शन उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होत आहेत. गरजू रुग्णालाच वेळेवर या इंजेक्शनची उपलब्धता व्हावी यासाठी भारतीय साथरोग् अधिनियम-1897 व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार मी, जिल्हाधिकारी रत्नागिरी तथा अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रत्नागिरी याव्दारे "**INFLIXIMAB**" या प्रतिविषाणू इंजेक्शनची उपलब्धता व व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे प्रमाणित कार्यप्रणाली निश्चित करीत आहे.

1) जिल्हा शल्य चिकित्सक,रत्नागिरी यांनी त्यांचेकडे उपलब्ध होणारा "**INFLIXIMAB**" या प्रतिविषाणू इंजेक्शनचा वापर अत्यंत आपत्कालीन परिस्थितीत गंभीर रुग्णांसाठीच करणेचा आहे. त्याचा गैरवापर होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. या एका इंजेक्शनची (Sun Pharmaceuticals Ind Ltd.) किंमत रु. 24,883/- आहे. खाजगी रुग्णालयांनी हे इंजेक्शन इकडून घेवून वापरल्यास त्याची किंमत शासकीय रुग्णालयाला परस्पर आदा करावी.
2) जिल्हयातील कोविड रुग्णालयातून येणा-या "**INFLIXIMAB**" या प्रतिविषाणू इंजेक्शनचे मागणीचे अनुषंगाने संबंधित रुग्णाचे सद्याचे प्रकृतीमान व त्या रुग्णासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार "**INFLIXIMAB**" ची आवश्यकता आहे का? या बाबत संबंधित रुग्णालयाच्या मुख्य डॉक्टरांनी मला व्यक्तीश: दूरध्वनीद्वारे बोलून मान्यता घ्यावी.
3) मान्यता मिळाल्यानंतर या कार्यालयाकडून इंजेक्शन संबंधित रुग्णालयाला देण्यासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे संबंधित समन्वयक श्री. सचिन पल्हाळ, औषध निर्माता (मो. 9921629253) जिल्हा शासकीय रुग्णालय, रतनागिरी यांजकडे सूपुर्द करण्यात येईल. संबंधित समन्वयक ते मागणी केलेल्या रुग्णालयाच्या अधिकृत कर्मचाऱ्याकडे पोहोच करतील. हे इंजेक्शन रुग्णांच्या नातेवाईकाकडे देता येणार नाही.
4) या कार्यप्रणालीच्या कामकाजासाठी नोडल अधिकारी म्हणून डॉ. चंद्रकांत शेरखाने, RMO (Out reach) (मो.9960183696) जिल्हा शासकिय रुग्णालय यांची नियुक्ती यादवारे करण्यात येत आहे. संबंधित रुग्णाचा PIF फॉर्म भरुन डॉ. शेरखाने यांचेकडे पाठवावा.
5) "**INFLIXIMAB**" वापराबाबतचा दैनंदिन अहवाल नोडल अधिकारी यांनी माझ्याकडे सादर करावा.

जिल्हाधिकारी
रत्नागिरी

**(लक्ष्मीनारायण मिश्रा)**
**जिल्हाधिकारी रत्नागिरी तथा,**
**अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, रत्नागिरी**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकामी :-**

1) जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी यांजकडे जरूर त्या कार्यवाहीसाठी
2) डॉ. चंद्रकांत शेरखाने, RMO (Out reach) जिल्हा शासकिय रुग्णालय, रत्नागिरी यांजकडे.
3) वैद्यकीय अधिक्षक, रत्नागिरी जिल्हयातील खाजगी व शासकीय DCH / DCHC, (सर्व)
4) श्री. सचिन पल्हाळ, औषध निर्माता, जिल्हा शासकीय रुग्णालय, रत्नागिरी